म. ग्रं. सं. ठाणें
विषय
सं. नं.

काव्य नं. २

# ...लापलहरी.

११२

नामें

रण...डदास कीर्तिकर.

यांणीं

काव्य

...रम प्रियपत्नि वज्रचूडेमंडित अ० सौभाग्यवती

## सोनाबाईच्या

स्मरणार्थ रचलेलीं

## पद्यें.

आषाढ शुद्ध १२ शके १८०४ रोजीं, प्रथम वार्षिक पुण्यतिथीला आप्त व स्नेहमंडळींत वाटण्याकरितां

मुंबई.

म. ग्रं. सं. ठाणें
विषय
संग्रहालय क्रमांक
लेखक का. र. कीर्तिकर
सन १८८२
पुस्तकाचें नांव विलापलहरी
१०३

# विलापलहरी.

नांमें

कान्होबा रणछोडदास कीर्तिकर,

यांणीं

आपल्या परम प्रियपत्नि वज्रचूडेमंडित अ० सौभाग्यवती

## सोनाबाईच्या

स्मरणार्थ रचलेलीं

**पद्यें.**

आषाढ शुद्ध १२ शके १८०४ रोजीं, प्रथम वार्षिक

पुण्यतिथीला आप्त व स्नेहमंडळींत वाटण्याकरितां,

मुंबईंत

नेटिव्ह ओपिनियन छापखान्यांत छापविलीं.

"गरुअंपि विरहदुख्खं आसाबन्धो सहावेदि"—

कालिदास—शाकुंतल नाटक.

"सुखं वा यदि वा दुःखं प्रियं वा यदि वाप्रियम् ।
प्राप्तं प्राप्तमुपासीत हृदयेनापराजिता ॥ १ ॥"

महाभारत—शांतिपर्वणि.

# पुस्तकार्पण.

॥ १ ॥

मोनी![1] चंपु![2] लहानु![3] नानि![4] पुतळा![5] ज्या पांच तुह्मी सती
मायेनें मज वागवा, भगिनिनों! मातेचिया संगतीं
घ्या ह्या प्रेमभरें "विलापलहरी" अर्पी तुह्मां बांधव;
जे भोगीं विरहाग्निजाळ, न कदा भोगोत तुमचे धव.

॥ २ ॥

ठेवा चित्ति सदा कृती भगिनिच्या, आहांत ज्या प्रेमळ;
तैशा सोज्वल हो स्वयें मधुमुखी, गंगा जशी निर्मळ.
राहें मी तुमच्या कृपापवनि तैं दुःखा जरा वीसरें;
आतां हो घडिही तुह्माविण मला नाहीं कदा तें सरें;

॥ ३ ॥

आहे जोंवरि जीव या कुडिमधीं, प्रेमें तुह्मां सेविन;
जन्मा आणियलें तुह्मां जननिनें भक्ती तयीं ठेविन;
सौख्यालागिं सदा झटोन सगळा देहो तयां वाहिन;
तुह्मांलागिं सखा सहोदर जणूं बंधू सदा राहिन.

---

१ माणकुबाईचें लाडिकपणाचें नांव. २ चंपुबाई. ३ लहानीबाई. ४ नानीबाई. ५ पुतळाबाई.

# विलापलहरी.

श्लोक.

१

लेवोनी सुकुमार पुष्पगजरे कुळर्या सुकेशांवरी,
भाळीं सुंदरशा सुकुंकुमचिरी, चाले जशी नोवरी,
हे लक्ष्मी! तशिगे शनैश्चरनिशीं त्यागोनि विश्वास या
तूं गेलीस, कशी सखे गुणवते, देवा न आली दया!

२

मायेच्या कळपांतलें कुणिकडे गेलें कसें वासरूं!
फोडी हंबरडा सुमाय, नकळे शांती कशी मी करूं.
नेत्रांतील बघोन अश्रु तिचिया, ज्वाळा हृदा लागती,
मानूं हें जरि पूर्ण, उत्तम दिली देवें प्रियेला गती.

३

अंगाची बहु आग जाहलि, तसें अंतस्थ पेटे अहा!
केली का ह्मणुनी तये निशि विभो! पर्जन्य वृष्टी महा?
ओतीले जलधी सहस्र युगही कायेवरी या जरी,
होई का हृद शांत ती परतुनी आल्याविना गोजरी?

४

जैशी अल्पसुखीं निमग्न असुनी संतोष मानीसगे,
तैसें जीवित अल्प तें; युतनये! आतां कशा मी जगें?
वानूं त्वद्गुण का सुकाय मृदु ती, सौंदर्य संभार कीं!
आहे माणुस कोणचा तुजसमा रत्नास गे पारखी?

५

नित्याजी मनिं शांत, स्थीर, तुजला केशी ज्वरें तापिली?
चंद्रासारसि शीतला कशि तुझी काया तयें व्यापिली?
त्वन्मृत्यू-निशि जाहली वसुवरी जी मेघवृष्टी महा,
आधीं घेउनिया नकां विझविला तैं अंगिचा गे दहा?

६

वायू अंबरिंचे सुशीतल नकां कायेवरी सुटले?
आरामार्थ उपाव जे करियेले, सारे कसे खुंटले?
नाना योग्य वनस्पती हरगुणी योजूनियां दीधल्या;
होत्या गे गुटक्या कटू परि सखे, सप्रेम म्यां पाजिल्या!

७

कोणेहीपरि हो बरी, जशितशी, इच्छीत होतें मन;
हातीं संजिवनी जरी असति या, देतों तुला जीवन;
आह्मों मानव दीन दुर्बळ परी, जातां न लागे क्षण!
शिंपोनी स्वदयामृता प्रभुवरें केलें न कां रक्षण!

८

केलेंशी प्रभुराय! मानित असें जें योग्य वाटे तुला.
मी दुःखें बहु गांजलों ह्मणुनि हे उद्गार येती मला.
भोगी शाश्वत सौख्य, अमृत तिला ठेवा असे लाभला
जाणें मी, परि प्रीय पत्निविरहें हृत्ताप हा क्षोभला.

९

भर्त्यावीण, सखे! घडीहि गमलें नाहीं तुला गे कधीं;
होशी खिन्न समीप मी नसलिया, कंपेस चित्तामधीं;
गांजी दुःख महा; विवेक करुनी, पोटींच तें ठेविशी;
भार्ये धन्य! वियोगजाळ मनिचा कोणा न गे दाविशी.

१०

झाला मास तुला, अघोर दिन हे यूगांपरी वाटले.
नित्या मी रडतों परी नयनिंचे अश्रू न हे आटले.
कैसे गे इतुक्यांत आटतिल ते? काया जिवे जोंवरी
रक्ताचे नयनीं झरे करुनिगे, न्हाणीन मी नोवरी.

११

प्रातःकाळि जयीं उठें, सुरुचिरा मुद्रा दिसे शांत ती,
भाळीं केश पडोन ते कुरळसे वायूसवें नाचती;
न्याळीं प्रेमभरें अशी पडलिया निद्रिस्त तूं मंचकीं;
ऐसें हें सुख भासलें, उठति तैं या अंगि रोमांच कीं.

१२

हे मृत्यो! तुज काय वाण पडली, घाला इथें घातला?
प्रेमानें स्वसुखा झटूं वधुवरें हा न्याय का जाचला?
नाहीं मोल्य असेंचि दुर्मिळ महा चोरोनि नेलें धन;
शोभा या गृहिंची समूळ सरली; ओसाड जैसें वन.

१३

रात्रंदीन अतां विचार पडला, गेली तृषा वा क्षुधा;
झालें जीवित तेवीं जेवि गरळें आम्लत्व येई दुधा;
भेला हस्तकिं लागला बहु कटू, जावोनि श्रेष्ठा सुधा!
आलें कां अजि हें कपाळि समजे त्या एकत्या सद्बुधा.

१४

बाळा दुग्ध विषार्क-मिश्रित जशी पाजी भ्रमें माय ती,
जावोनी प्रिय प्राण आहुति मिळे काळा तयें आयती,
तैशी सोनु-सुता जगज्जननिनें का आहुती वाहिली,
पाजोनी चुकुनी तिये ज्वर-विष, प्राणप्रिया दाहिली!

१५

जेवीं बास्य सुरेख निर्मळ असे, शुद्धा तशी अंतरीं;
दुःखाची परिहारिका सुतरणी, साक्षात् सुधन्वंतरी.
सोना साजत नाम,चोखट सदा होतीस सोन्या समा;
ज्येष्ठा जेविं सुता अपूर्व वनिता, सर्वैः तशी उत्तमा.

१६

तुझ्या संगें होतीं अनुपम सुखें लाभलिं मला;
तुझ्यावीणें अन्या नव्हति भुवनीं प्रीय विमला;
अतां त्यागीशी तूं हृदयिं तरि शांती कशि वसे?
अहा गेलीशी मे, दिवस न कळे घालवुं कसे?

१७

तुझे ठायीं पंच प्रियकर सखे प्राण गुतले;
तुवा त्यागीलें तैं विरहशर त्या हृत्ति रुतले;
प्रिये तूझ्यावीणें कवण शर ते काढिल कसे?
तुझ्या एका त्या आगमनिं, ललने शक्ति ग असे.

१८

कुठें पाहूं आतां रमणिय तुझ्या हास्यवदना!
पडे कर्णीं तूझें मृदुवचन येतांचि सदना!
करूं आतां वर्ण-श्रवण वद कैचें कमलिनी?
विझालीशी ज्योती! बहु तळमळें मी निशिदिनीं.

१९

जणूं कोकिला पूर्ण माधुर्यखाणी;
सुखें आयकें अमृताजेवि वाणी;
तुला शारदा पावली बुद्धिदाती;
न कां तूज रक्षावया धांवली ती?

२०

अहोरात्री जीवा तरफड, न कांहीं गमत गे;
जरा घेतां निद्रा, दिससि मज स्वप्नीं जिवलगे!
तुझ्यासंगें भार्ये! सकल कुल-सौभाग्य बुडलें!
अकालीं त्वां जावें, कवण असलें पाप घडलें?

२१

रडोनी स्फुंदोनी नयन सुजले अश्रु गळती.
अतां निद्रा कैची, विरह-विष-दग्धा काय जळती
ह्मणावें गेलीशी रुसुनि मशि दावा करुनिया,
कसें तैसें होई?-तुजसम न शांता भुवनि या.

२२

परम विबुधकन्या, प्रेमला ज्ञानखाणी;
विनय कितिक अंगीं, काय ती गोड वाणी!
अविहित सुख भोगा नेणती वाऽनृतातें
अति विमल सुचित्तें वाढवीली स्वतातें.

२३

अनुचित कधिं कर्मा जी सती ना धजाली,
अशि तुज पितरांनीं नोवरी सिद्ध केली.
वरुनि तुजशि चौदा झालि वर्षे जरी गे,
प्रियतर प्रतिरोजीं वाटलीशी शुभांगे!

२४

अश्विनीकुमार कां न भूतलाशि पातला?
कां असा कठोर ताप कोमलांगि मातला?
कर्दळीस लोहभार का कधींहि पेलतो?
गुलाब का कधीं हुताश वेष्टितां प्रकाशतो?

२५

सदा जी चित्तादे सुख मधुर वाणी वदुनिया
महा माया लावी सतत सकलां दावुनि दया;
बहू ज्ञाती स्त्री ती परि तिज नसे गर्व तिळही;
गुणां गाई तीच्या सकल बहु संतोषित मही.

२६

संभारा वपुच्या कशी कटि तिची वाहे तिलाची कळे
शोभे नूतन पुष्प फुल्लित जसें सर्वांग तें कोंवळें
कांतीचें पडतां सुतेज तिचिया हृन्मंदिरा मोहरी
रम्याती नयनांसि हर्षावि सदा संताप वा संहरी.

२७

अशा सौंदर्याची तनु सजविण्यालागिं रुचिर
नको आलंकार; स्वरुप बघतां चित्त सुचिर
रमे लावण्यें; ती नयनिं न कदा अंजन भरी
नको तीतें कुंकू-तिलक अथवा रेखित चिरी.

२८

वधें जैं ती मुद्रा, जधिं सकल संतोष पवती,
ह्मणें तें तें देवें दिधलि वसुधे कां अशि सती
सदा भासे मातें न मनुजसुता ती द्युतनया
चुकोनी भूपृष्ठीं उतरलि वरोनी सुविनया.

२९

तुजविण सखये मी जाहलों दीनवाणा
तुजशि परतवाया अर्पितों मी स्वप्राणा,
परि मज मनिं आहे हें प्रिये! पूर्ण ठावें
परत न कधिं येशी प्राण कोटीहि द्यावे.

३०

रुचिर सुमुख पाहीं होइ आनंद चित्तीं,
नयन भरित प्रेमें, नित्य संतोषवृत्ती,
नलिनिकमल ऐशी काय ती गौरवर्णी
अनुपम वधु तूतें बुद्धि गे काय वर्णी!

३१

तुजविण कमलाक्षे! पूर्ण निर्जीव काया,
अवचित फसवाया लाविली काय माया?
सगुण नवर-जाशी, हा नुरे प्राण आतां,
कठिण मजशिं वाटे भारि गे काळ जातां!

३२

सुखकर बहु भार्ये! पूर्ण तूं गे पवित्रा
मधुर वचनिं, स्पर्शीं, तोषिशी सर्व गात्रां
जणुं नयनकटाक्षें पाजिशी अमृतातें
भवसुख हर! गेलें पावतां तूं मृतातें!

३३

कलश जणुं सुधेचा लाभला मशिं होता
हिसकुनि हर नेला तोचि तोंडाशिं नेतां!
रस मधुर तयींचा सांडला कीं पडोनी
निसटुनि तशि जाशी, कोवें आलें घडोनी!

३४

ऐसा थोर वियोग दुःसह कुणा होणार ना मानवा?
ऐश्वर्या नव्हताचि पार दिधला आनंद नित्या नवा!
घेतां सौख्य-विलास-काळ जवळी त्वां धांव ही घेतली
संगें मद्रमणी! तुझ्या हरपली शोभा स्वगेहांतली!

३५

केला म्यां अभिलाष फार ह्मणुनी का घेतली धांव गे!
गेली कायजळोनि माझि अवघी कां जीव आतां जगे!
वार्ता मी मनिची कुणास कळवूं, सांगूं कुणाशीं गुजा!
आहे मत्सम कोण या त्रिभुवनीं प्राणी अभागी दुजा?

३६

कृपण धन जसा तो जोडि नाना उपावें,
निरखुनि मग त्यातें मानसीं तोष पावे;
तुज अति रमणीला तेंवि मी पूर्ण प्रेमें
परम-धन-सुभार्ये! न्याहळीं नित्य नेमें.

३७

रक्षाया तनुतें असो मनि नसो अन्नोदका सेवितों;
घेतां ग्रास मुखीं पडे स्मरण गे कंठीं तसा राहि तो.
भासे सव्य करीं उदास जिकडे बैसेस जेवावया!
होते ना जगिं का उदंड पडले प्राणी दुजे न्यावया?

३८

भार्ये! तूजसमा सुमित्र जगिं या कोणी दुजा गे नसे
कान्ते! पायिं तुझ्याच सौख्य सगळें गेहीं सदा तें वसे
शोभा शून्य गृहास या उपरि गे घेणार नाहीं कदा
होत्या सन्मुख बैसतां हरत त्या संसारिच्या आपदा.

३९

अंतर्याम न भिन्नतें जरि दिसों देहीं निराळे जना;
केलें नाहिं कधीं न जें अवडलें दोघांचियां गे मना;
आतां यापरि एकलाचि जरि मी राहें तुझ्या नंतरें
नाहीं मी करणार वाटत नसे जें तूजलागीं बरें.

४०

नाहीं सन्निध तूं, सुमंदिर परी आहे हृदीं या तुझें
भासे दुःसह शून्य विश्व, परि का ज्योत्स्ना हृदींची विझे?
गेलें मर्त्य शरीर पावुनि लया, राहे परी अंतरीं
दिव्या गे प्रतिमा तुझी! स्मरतसें नित्या गुणांच्या परी.

४१

सोने! तूं जनकासमान अपुल्या लोकप्रिया सद्गुणी,
सौम्या, सभ्य, अलभ्य, दिव्य, करुनी गेलीस आह्मां ऋणी!
सेवा केलिस आमुची; झिजविलें त्वां अल्पशा गे वया,
नाहीं कां तरि राहिलीस अमुची सेवा प्रिये घ्यावया!

४२

होतों भावित एक मी, घडुनिया आलें परी दूसरें;
नाहीं गे सरलें घडी तुजविणें, आतां कसें तें सरे?
होतों बैसत नित्य एकवट हीं भर्त्ता सुभार्या सती;
जाशी टाकुनि एकटीच नकळे होईल कैशी गती!

४३

किति तरि गुण तूझे राजसे आठवावे!
शतयुग तप तूझ्या नामिं गे म्यां जपावें,
परि न मज मनाची तृप्ति होई कदा ती
सकल भवसुखाची मूर्ति तूं पूर्ण शांती!

४४

होतें स्वप्नि गे प्रिये! तुज मृता स्वांदेपरी वाहवें,
येतां तें दुखणें समीप तुझिये सेवेंत गे राहवें,
इच्छा तांपियली तुझी प्रभुवरें, केली तयानें दया,
होतों सन्निध घोर अंतसमयीं स्कंधावरी न्यावया!

४५

नाहीं गे तुज दीधली निजकरें सप्रेम तीलांजली,
रात्रंदीन रडें परी न सरली ही वृष्टि नेत्रांतली.
नाहीं ओदन-पिष्ट-पिंड दिधले, केलें न वा तर्पण
सारा देह तुलाच पिंड ह्मणुनी केला न का अर्पण?

४६

अंतर्पाट जये सुकाळिं सुटला, आनंद होता महा
झाली भेट सखे तुझी प्रथम जें, घेतां वर त्वद्गृहा,
"स्वाहा" गे ह्मणुनी तये समयिं, ह्या देहा तुला दीधलें;
द्याया पिंड अतां नसे बळ मला, काळें हृदा विंधलें!

४७

जेव्हां ऐकियलें सुरत्न मिळतें, घेतां तुझेसारिखें
स्वीकारोन तुला झणी भरियलें आयुष्य नानारसें;
आनंदें भरला, त्यजोनि अवघें द्याया तुला धांवलों;
प्रेमें नांदुनि पूर्ण गे उभयतां नित्या सुखा पावलों.

४८

काळी वस्तु कधीं न साहत अशी आहे वदंता कुलीं;
जाया श्वेत सुगौरवर्ण वरिली, कां नाहि ती जीरली?
काळें गौर, लहान थोर, न कदा काळापुढें टीकती,
घाला घालि बळें गमे जिथतिथें, घेवोत दुःखें किती.

४९

मन तुझे चरणीं रमलें सखे!
कितिक रंजविलें वदु का मुखें?
अवडलीस मला बघिल्याक्षणीं
सुविनयी वधु नित्य सुलक्षणी.

५०

त्यजुनि गेलिस येशिल गे कधीं!
सुख मला नुरलें जगतीमधीं!
वदकिं येशिल तूं परतोनिया!
विरस जीवन अंतरतां प्रिया!

५१

जाशी सोडुनि एकटी कुणिकडे, सोने! प्रिये सुंदरे!
लोभें सांठविलें सुखा, घडिमधीं केसें मला अंतरे!
पाहें जैं मुखचंद्रमा मन रिझे, हृत्ताप सारा हरे;
आतां लागलि हाय हाय, वदतों नित्या 'अहा' 'हा' 'हरे'!

५२

गेलीशी अजि टाकुनी भवसुखा, वाटेस गे बापडी;
जातां त्वां अपुल्यासवें सुनयने! नेला न कां सौंगडी?
कठूं काळ कसा सखे! तुजविणें या मंदिरीं राजसे,
पाहीं जेथ तिथें उदास अवघें आतां मला गे दिसे!

५३

परम कपटरूपा निर्दया क्रूर काळा!
हृदय नरम माझें; नाहिं पाषाण शीळा.
शत दशशत घातें विंधिलें त्या हृदाला;
भवसुखिं रत होतां घातला दुष्ट घाला.

५४

अनुचित अजि केलें कृत्य रे दुष्ट कर्मा!
अतुळ बळ तुझें त्वां लाविलेंशी अधर्मा.
प्रबळ निबिड केलें अंधकारा सभोतें
झडपुनि क्षणमात्रें रत्न नेलेंस घातें!

५५

बहु झळकत माझ्या मंदिरीं रत्न होतें
न तुज अवडलों का नांदतां एकचित्तें?
मम वधु परतोनी येइ आतां घराला
हरहर! उरलीना ऐसि आशा मनाला.

५६

देवा जें तुझिया मनास रुचलें केलें तुवां हें खरें
नेलें त्वां नसतें अकालि तिजला होतें अनेकां बरें
कल्याणार्थ परांचिया झिजविली काया तिणें आपुली
होती पूर्ण जशी अपूर्व दुहिता दीनां तशी माउली

५७

वधुवर सुख भोगा व्यत्ययया आणिलें का?
प्रखर विरह म्यां का पाडिला मायलेंका?
ह्मणवुनि भगवंता दंडिलें काय माला?
प्रिय मज किति होती नेणलें का कृपाला!

५८

मज जवळि सुधा ही राहुं कां दीधलीना?
परम विनत कां ना घातली भीक दीना?
प्रभु तुज कमताई काय ऐशा सतीची
पडलि; हरण केली गोड वस्तू जिवींची!

५९

शांता ती अनिवार गांजलि महा दुःखानळें पोळली!
काया पुष्पलतासमा प्रखरशा दुष्ट ज्वरें जाळली!
गेले खोल कपोल वर्ण तयिचा सारा दिसे कोमला
झालें गांडस अंग शुष्क, हृदया दुःखाग्नि त्या झोंवला!

६०

बोले एक दिनीं सकाकळुन तीः–"होईन केव्हां बरी!
"शक्ती क्षीण गमे दिसेंदिस मला आराम ना अंतरीं!
"चित्तीं वाटत स्वस्थता नचिं मला सांगा करूं का तरी?
"देतें कष्ट तुम्हांस मी करवुनी घेतें खडी चाकरी!

६१

"वारा संतत घालतां, श्रमतसां, मी धन्य ही नोवरी!
"केव्हां कामिं पडेन हो?–थकतसां, बैसा पलंगावरी!
"लावावा अवघा सुकाळ तुमच्या सेवेंत सौख्यें सदा,
"आहे मानसिं हें; घडे परि दुजें, तेणें न शांती ह्रदा!"

६२

ऐसें ती करुणास्वरें वदत जों, छाती तियेची भरे;
स्फुंदे म्लान मुखावरोनि कुरळ्या सारोनि केशां करें!
बोलें मी कुरवाळुनी दिसत जी निस्तेज पुष्पापरीः—
"स्वेच्छेनें प्रभुराय रक्षिल सखे! होऊं नको घाबरी!"

६३

इंद्राचें धनु दिव्य शोभत असे आकाशपंथावरी;
सौंदर्यें भरल्या दिशा, विलसती ते रंग नानापरी,
झाली शीतल मेघवृष्टि, फुलल्या गंधी फुलांच्या कळ्या;
होतां तुष्ट धरा वनीं विकसल्या रम्या लता कोंवळ्या

६४

वारा वाहुनि मंद मंद परिसा आनंद दे मानसा;
शोभे विश्व, असें खुले अखिल हें कीं नीववी तामसा;
ऐसा रंग सुरंग तो जिथतिथें होतां मला एकल्या
कां दुष्काळ पडोन घोर सदनीं ह्या पेटल्या आगल्या!

६५

गंधें ते भरले सुकेश कुरळे, सोडोनि त्यां मोकळे,
लेवोनीं फुलहार दक्षिण करीं, दो मोतियांचे कळे,
बैसे सुंदर नार पत्र पढती, हर्षें नहाती सुखी;
घाली सोलुनि घेलची विलसती ती वामहस्तें मुखीं;

६६

स्वानंदें रमतां अशी स्वसदनीं एकाकि एके दिनीं
त्या मी मागुनि देखिलें सुगुणिला, जी गंधर्वी मेदिनी;
यत्नें आकलुनी हसें, न कळतां बेसें हळू तत्स्थलीं
खुर्चीं आड लपोन "सोन!" ह्मणुनी म्या हांक मारीयली.

६७

ऐकोनी मम शब्द, तेथ परिना डोळीं मला देखतां,
पाहे चोंहिकडे, मनीं दचकली; आलों पुढें हांसता;
पोटाशीं धरिलें तिला कवळुनी; राहें समोरा उभा;
केला फार विनोदः-ह्या अतःपर अहा क्रीडा महा दुर्लभा!

६८

निशिदिनि विरहानें शीणलों होय होळी!
ह्रदय सलत माझें येई निद्रा न डोळीं!
तळमळ मनि होई वेदना सोसवेना;
विपरित गति ऐशी जाहली कां कळेना!

६९

कीं प्रीति फार ह्मणुनीच विजोड झाला!
काळा कसा मनि तुझ्या द्रव नाहिं आला!
होतों अमोल सखिचा बहु मी भुकेला.
मृत्यो! कसा गृहसुखा अजि अंत केला!

कीं भासला सकल पूर्वज पुण्यठेवा!
भर्त्त्यांकरीं न घडली तिचि योग्य सेवा?
कीं देवराय परिपूर्ण दयार्द्रदृष्टी
नेवोनियां स्वसदनीं तिज देइ तुष्टी?

७१

नाहीं परी कळत हें;-मम काय हातें
झालें असें प्रबल पाप,-दुकाळ मातें
ऐसा पडोन जगिं सौख्य मला नुरावें!
वाटे भुमीमधिं जित्या तनुला पुरावें!

७२

*यालों नाहिं रणीं; पराङ्मुख कदा झालों न मी संगरीं
धिःकारोन तुला, न भीति धरली मृत्त्यो! तुझी अंतरीं;
होतों मानित युद्धि धैर्य करूनी त्रैलोक्य म्यां जिंकिलें;
मृत्त्यो! त्वां हरिलें परी घडिमधीं दुःखार्णवीं लोटिलें.

७३

मोठा तस्कर तूं शिरोन सदनीं नेलें अमोला जिवा!
घालोनी झडपे झणीं रविसमा मालीवलाशी दिवा!
झाला घोर गृहांतरीं तिमिर; तें वाटे अरण्यासमा.
नाहीं अंत वियोग-दुःख-जनिता संसारिच्या या तमा!

७४

धुम्रावीण जसा सवें भडकुनी अग्नी महा कोपतो
तैसें संकट येतसे कधिकधीं तें जीव तो व्यापतो
होतें सौख्य किती! पहा क्षणिं कसा दुःखार्णवीं बूडलों
जातां एकचि दिव्य प्राण विरहें आजन्म मी नाडलों!

७५

काळा ! आचरिलें अघोर अजि त्वां हें कर्म शोकान्वित!
हत्या दोषचि घेतला शिरिं; प्रिया कां सोडलीना जित?
शोभे जी अति दिव्य कर्दळिसमा काया तिची कोंवळी
हाणीली, कपि जेविं चूर्ण करितो मुक्ताफळें पोंवळी!

७६

ऐसें अल्पवयांत का हरपण्या निर्माण केलें हिला?
काळातें बलि अर्पिण्यास वसुनें का भार हा वाहिला?
प्रेमें वाढविली हिला जननिनें का अग्निला आहुती?
हे बाहू! अशि प्रीयकाय दहना स्कंधीं कशी वाहु ती!

७७

आक्रोशें रडते सुमाय; बघतां रोमांच ते ऊठती;
अश्रूंचे पुर वाहुनी ढळढळां नेत्रांतुनी चालती;
झाला म्लान मुखेंदु शब्द तिचिया कंठस्थलीं दाटला;
नाहीं भूवरि लोळली, तरि तिचा दुःखें उरू फाटला!

७८

कसा दरवडा तुझ्या तनुधनावरी घातला!
तुझ्या हरुनिया जिवा दुखविलें प्रिये भूतला!
महा प्रळय गे गृहीं! तनु पहा कशी कांपती!
कसा न द्रवला परी प्रभु दयानिधी भूपती!

७९

प्रियास्वरुप पाहतां द्रवत काष्ठपाषाणही,
कुऱ्हाड पडली परी धडकुनीच माझ्या गृहीं!
न काळ जनमित्र तो, मज गमे महा वैरिसा
करोन जतने अर्धी पुरवि अंति दावा असा!

८०

विझेल कशी अग्निची प्रबळ पेटली आग ही
उडी त्वरित घालवों जरि विभक्त होई मही;
अगे धरणि माय! घे हृदिं तुझ्या मला सत्वरी
न सोसवत दुःख हें, कितिक आठवूं अंतरीं!

८१

रथावरुन खालती उतरतांचि हाता धरीं;
न देइं, कर मागशी, उतरतां शिडी पायरी;
अतां गगनिं जावया कुणि तुला दिला हात गे!
न कां मजशि वारिलें? विधुर व्यर्थ आतां जगें!

८२

गमे गगन-पायऱ्या तुजसमा सती-सज्जनां
महा सुलभ गे; अह्मां जगिं विलाप, तद्यातना.
अनंत-सुख-धामि हो सुलभ रीति जातां तुह्मी.
फुटोन हृद, घातकी-विरह-जाळ भोगूं अह्मी.

८३

मातेनें कधिं एकटी तुज सवे नाहीं ग विश्वासली.
गेलीशी अजि टाकुनी सकळियां कां तूं अशी एकली!
का आह्मी तुझिये सवें प्रभुपदीं येण्या नसों योग्यसे!
येई का कधि योग्यता अशुचिये ठायीं अशी राजसे?

८४

शांत निद्रित धरा अवघी पडे,
झाडपान न ढळे कुणिहीकडे
किल्किलाट न करी चिडि पाखरूं,
जागजागिं निजताति लता तरू;

८५

कर्ण एकहि ध्वनी नचि आयके,
शांत अंबरिं न शब्द उठों शके
शांतता गिरिं गव्हरिं ती वसे,
शांत शांत जिकडे तिकडे दिसे;

८६

सुप्रभात अति शांत मनोहर;
शांत सांज दिसते बहु सुंदर;
शांत तो जलधिही अति निश्चळ;
शांत इंदुकिरणें अति कोमळ;

८७

शांतता परि नसे मम अंतरीं,
येति दुःखलहरी वरचे वरी!
कंपुनी जलधि जेविं उचंबळे,
तेविं मी वळवळें विरहानळें!

८८

नाना चित्रविचित्र नित्य करिं मी थट्टा तुझ्या गे किती!
"माझें सोंग" सुनाम प्रेमल असें तैं पावलों निश्चिती.
'सोंगा या,' 'अमुकें करा' करूंनका सोंगा' 'अरे सोंगड्या'
हाका तूं मज कोमले मधुरशा मारीस तूझ्या गड्या!

८९

जावें त्वां मजला प्रिये पुरवतें,–दुःखें रडावें सदा;
कंठावा अवघाचि काळ विरहें–भोगूनिया आपदा;
हाणावा ह्रद हाय हाय करुनी, भूमीवरी लोळुनी
सोसावें विरहानळा जरिं असें गेलों पुरा पोळुनी.

९०

सारें हें पुरवे; न तें पुरवतें होतां तुज्या गे परी-
जातों आधि जरी तुला ढकलुनी शोकाचिया सागरीं
होतां ही विपरीत गोष्ट पडता आक्रांत निस्सीम तो
नाहीं सोसवता तुला विरह जो यत्नें बहु सोसतों.

९१

सौभाग्या तव रक्षिलें प्रभुवरें हा लाभ झाला भला;
सोसावें न तुवांचि दुःख परि म्यां, हें योग्य वाटे मला;
मी आहें रणशूर; शांत अबला तूं भीरु गे कोमला,
चिंता का, जरि देह होइ दुबला, शोकें तुझ्या कोमला?

९२

युद्धार्थि वरा तुझ्या प्रभुवरें संरक्षिलें सुंदरी
होता सन्निध काळ तो परि तदा कृत्रीम ना आचरी
पाठीं रक्षक सत्कृपाकवच तें घालोन राहे उभा
टाळीलें अशुभा, तुझे पदरिं गे बांधोन दिध्या शुभा.

९३

केलें सार्थक त्वां स्वतनुचें अल्पायुर्षी आपुल्या
घेवोनी कुलिं श्रेष्ठ जन्माचि पिढ्या त्वां सात उद्धारल्या
नाना सौख्य-सुभोग भोगुनि सखे होतीस जैशी इथें
त्याहूनी शत कोटि कोटिपटगे होईं सुखी तूं तिथें!

९४

झालों मी, अवघें जिणें मम तसें, पाण्याहुनी पातळ.
नेवोनी गगनास वृक्ष वसुतें पाडी जसें वातळ,
येतां भूवरतां विदारुन पडे, जीवा पुनः तो नये;
तैसा मी पडलों, अनेक तुकडे झाले स्वदारा-लयें.

९५

मोठ्या सांपडलों प्रचंड पवनीं चौफेरसा घेरलों.
आहा कोसळलों धरातळवरीं निर्जीव मी जाहलों!
येवो येइल जीव तो पुनरपी, केव्हां कुणेही परी
गेलेलें सुख ना कदा मज मिळे, भार्याहि कल्पांतरीं.

९६

जैसा तस्कर दावुनी गुळ बरा प्राणासि गांठी मला
तैसा दावुनि गोड घांस मजला, काळें गळा कापला
लागोनी ममता मला अधि मह्हा, झाला असा अंत हा!
शांतीतें सति पावली; भडकला माझ्यांत अंतर्दहा!

९७

खळा काळापायीं सकल भव एकाकि फिरलें
कशामाजी आतां तिळभर नसे प्रेम उरलें
तिच्या केसें केलें उदक-सम-निस्तेज रुधिरा?
छपावीतां येती तरि छपविती ती वसुधरा.

९८

धरेनें रक्षीली असति सकुमारा सुवनिता.
मुळापासोनी रे कशि उपटली कोमल लता!
न का शेताठायीं जनकतनया वाढलि सुखें?
न का शाकुंतांनीं चरविलि शकुंतेसि सुमुखें?

९९

तशी कोण्या प्राणें सदय असती रक्षिलि सती
कपाळींची तेणें असति टळली दुःसह गती.
अहा मृत्यो! तापा! तिजशि तुह्मि न्यावें न रुचलें
उपायां योजावें कवण अणखी हें न सुचलें

१००

आला हा अजि गौरिचा दिन महा गौरी घरीं मांडिती.
लक्ष्मीचा अवतार गेलि सुखदा माझी कुठें गौर ती?
नाहीं तूं पतिच्या घरीं दिसत गे माहेरिं का गेलिशी?
तेथें शोधियलें परी न दिसशी, केव्हां अतां भेटशी!

१०१

आला हा दसरा अजी जन पहा सोनें सुखें वांटती.
गेलें सोज्वल हातिचें मम अहा सोनें प्रिया ती सती!
का कोणी मम मित्र येउनि घरीं सोनें ह्मणोनी तिला
साक्षात् ठेविल हस्तकीं अजिदिनीं सोना प्रिया कोमला!

१०२

गंधें नाहति आजि लोक सुखि हे, लावोनिया उंटणीं
अश्रूपूरिं अह्मी न्हात बसलों भोगीत ही जाचणी!
आह्माला दिपवाळिचा सण नसे, होळी सदा जाहली!
का ही आग विझेल अश्रुंत जरी काया सदा न्हाहली?

१०३

मित्रांनों जरि येतसे सुहृदयीं माझी तह्मा हो वृथा;
गाळा अश्रु सुमित्रभाव धरुनी, एकत्र आणा तयां.
अश्रूंचा बनवा सुसागर जयीं राहीन मी बूडला,
योजा थंड उपाय आगटिमधीं हा जीव हो कोंडला!

१०४

फिरें जिथतिथे तुझा मजसि भास होई सदा;
मला त्वरित येउनी धरिं ग शोकग्रस्ता हृदा.
सखे! परत येइं गे, तुजसवें रमूं दे गडे!
पुनः तुज नदेखिल्या करिन काय मी बापडें?

१०५

कसा अतुल भार हा विरहजन्य साहूं शिरीं?
कसा सखि तुझे विणें क्रमुं ग काळ हा मंदिरीं?
कसें क्षणिच अंतरे अमित सौख्य-भांडार तें-
जपोन उपभोगिलें सुधन दिव्य जें म्यां रतें!

१०६

विनोद करुनी महा रमविशी तुझा "सोबती".
प्रिये त्हृदयरंजने! कवण हाक मारील ती?
न सोबत अतां मला विरह-अग्नि वांचूनियां!
जगेल तनु जोंवरी, स्मृति तुझी न पावो लया!

१०७

कोठें वास सखे करिशिलूं, का अन्नगे भक्षिसी?
रक्षीली जशि काय त्वां वसुवरी तैशीच का रक्षिसी?
कीं स्वर्गीं निजआत्मरूपि रमती आनंदसिंधूमधीं
आहेसी सदयप्रभूपदिं सुखें भोगीत लक्षावधी?

१०८

जगीं बहु पदार्थ ते असति, दोष नाना जयीं
न दोष तिळ आंगिही; अति अलभ्य अल्पोवयी!
वधें जिथतिथें दिसे तिचि सुमूर्ति डोळ्यापुढें
जसें प्रखर अग्निनें कढत तैल तैसा कढें.

१०९

खावें देशिल जें अह्मां प्रभुवरा स्वेच्छाप्रभावें सुखें
ल्यावीं पांघुरणें तुवांच दिधलीं, बोलूं नये रे मुखें.
दुःखाचा सुटला महा पवन तो, आलें महा वादळ
संतोषें तरि राहवें, प्रभु सदा तूं आमुचें रे बळ!

११०

धांवा ती करितांचि द्रौपदि सती पाठीं तिच्या तूं उभा
ठेलाशी प्रभु कृष्णरूप धरुनी डोले मनीं ती सभा;
वस्त्रें बा सदया तुवां पुरविलिं लज्जा तिची राखिली,
नाहीं ऐकियलीस काय करुणा जी दीन मी भाकिली?

१११

नाना रे अवतार त्वां धरियले भक्तांचिया पालना;
रक्षायासि न धांवलाशि ह्मणि कां देवा सुदिव्यांगना?
नाहीं दुःख लहानसान, सुखदा त्वद्रंजनी लोप हा!
माझें दैव अजी समूळ फुटलें त्वद्भग्न झालों अहा!

११२

घरा यावें तेव्हां मज दिसतसे चंद्रवदनी!
आतां कोठें गेली कुणि लपविली काय सदनीं!
पहावें धुंडोनी सकल गृह खालीं वर तरीं
दिसेनाशी कोठें; अनिश उठती दुःखलहरी!

११३.

बुडालें सौभाग्य प्रखर विरहाग्नी प्रदिपला.
जळालें ऐश्वर्य त्यजुनि मज जातां सुविमला.
तुवां जावें ऐसें सुकृत अजि का सर्व सरलें?
रमावें, क्रीडावें, अवचित परी रत्न हरलें!

११४

महा मिथ्या माया सकल जग साचें मृगजळ.
उलाढाली होतां विविध परि लागे नचि पळ.
प्रभा जीची पूर्णा रविसमपडे नित्य सुखदा,
तिथें आतां झालें तिमिरमय; मी भोगि विपदा.

११५

गृहामाझारीं मी फिरत दिनरात्रीं ग ! बुजला;
कशी आयुष्याची पडलि सखये वाण तुजला !
मुखीं काळाच्या का अलग पडण्या वह्नि रुजली?
अशा देवें कां हो अणुभरहि ना शक्ति दिधली ?

११६

देवापायिं सुखें विलसशी हें जाणतों निश्चयें;
नेई मोक्षपदाशि, उत्तम गती भक्तांशि देई स्वयें.
आलें संकट आजि साह्य करण्या भावें तया बाहतों
अंतीं भेटुनिया पदीं अढळ त्या नांदूं मनीं वाहतों.

११७

सर्पाचा पुरवेल दंश; कडवी ती काचरी खाववे;
अग्नीनें घत तापलें कढत तें युक्तीकरें प्राशवे;
ज्वाळा जाळति दिव्य जैं दशदिशा मार्गें तया चालवे;
विंचवांनी भरल्या अश्या भयकरी वस्त्रांशि त्या घालवे;

११८

काळा दंशपरी तुझा प्रबल तो नाहीं कदा साहवे.
दुष्टा !काचरिहून तूं कडु, तुझ्या वाऱ्या न तें राहवे;
अग्नीहून तुझा महा प्रखर तो आहे मनींचा दहा;
झालें काय जिवांत आज वरितें सांगूं कुणा मी, अहा !

११९

पहावें जेव्हां तों हसित सखि ! वक्त्रांबुज दिसे;
पतीठायीं हेतो धरुनि पतिसेवेंत विलसे !
क्षुधार्तांशीं भक्ष्यें, तृषित मनुजा शीतळ पयें,
महानंदो होई,—तुज कवळिली तेविं त्हृदयें !

असंख्य खळ या जगीं प्रभु तयांस तूं तारशी
जिता मजशि ठेविशी परि जित्या जिवें मारशी.
असें प्रभु खळांमधीं परम कायतो मी खळ
न कीं मजशि दीधलें दयित तारण्याला बळ.

१२१

प्रभो दुरितयुक्त मी परम पातकी का असा
न कीं तव अनुग्रहा करिशि तूं मला पात्रसा?
अहा कशि मनोहरा मधुसमा प्रिया अंगना!
कुणा कधि जिच्या दिसे तनमनामधीं व्यंग ना.

१२२

होतों स्वामि तुझा, भ्रतार ह्मणुनी, मानीस ऐसें जिवीं
मानीलें जरि त्वां तसें, मजसमा मी तूजला वागवीं;
जाशी संतसुमालिकेंत मरणीं, झालों तुझा दास मी;
झालीशी गुरु तूं, सुपादरज मी आयुष्य आतां क्रमीं.

१२३

• सखे सुखद एकदां मजशि भेट देई गडे!
मनीं तळमळें पहा मज न चैन कांहीं पडे;
पडेल मजला कसा विसर गे तुझा राजसे?
जिथें बघि तिथें तुझें स्मरण-चिन्ह माला दिसे.

१२४

पहा चिरडि ही इथें पडलि तेथ ती कंचुकी!
स्वठांधि फुलहार ते सकल कोमले मंचकीं!
तशीच फणि आरशी पडलि जेथ तेथें पडे
तयांस बघतां प्रिये! उतरतें खळाळां रडें!

१२५

"माने* ये! मजपाशि गे निज तरी निद्रा मला येइल;
"वारा घालुनि ह्यांति, सांग भगिनी! गोष्टी सुखें प्रेमल"!
रात्रीं शेवटच्या असें वदलिशी, निद्रा न आली तुला
तेणें अंत समीप येउन तुझा देहोगमे आटला!

१२६

येतां सन्निध अंतकाळ पुसती कांका तुला स्फुंदुनी
आहे हेतु मनीं तुझ्या वद तरी, ठेवीं अह्मां सांगुनी.
"ऐसें हें मज पूसतां रडत कां?" केलेंस प्रत्युत्तर
"का ह्या शेवटच्या घडी?" हर! विभो! का अंत हा दुर्धर!

१२७

"कांका! पितृसमा बरेपण तुह्मीं केलें अह्मा सारियां
"तेवीं याउपरीं करा, जिविं धरा जीं जीं रहाती तयां!"
"दादी! त्यांस नसे खरें कुणिच तें, टाकूं नको त्यांजला
"सांगाया मुळिं हें नको; पुसियलें, सांगे तरी मी तुला!"

१२८

मग पुसें कुरवाळुन सुंदरे
"वद सखे वद शेवटच्या स्वरें!"
वदलिशी तधिं तूं करुणारवें
"जननिचे सुतहो तुह्मि राहवें;"

---

* भगिनी माणकुबाईचें लाडिकपणाचें नांव. १. डाक्तर आत्माराम पांडुरंग. २. मातोश्री नामविशेष. ३. मला उद्देशून.

१२९

"जरि मज प्रभुरायें आपुले पाशिं नेलें
"अघटित न करावें हो, जरी दुःख आलें!
"जननि भगिनि बंधू मानुनी आपुलीशीं
"न कधिंहि पडुं देऊं वाण माझी तयांशीं!

१३०

"ठेवोनी माय येथें भगिनि सुगुणिशा, देवपायीं मला ने;
सांभाळा प्रीय माता, कधिं न तिज पडो घोर माझ्या मृतानें
सांगावें काय तुह्मां सकल अपुलिये अंतरीं जाणताहां;
भारी ही घोर वाटे घडि मज सुटतां प्रीय माता अहाहा!"

१३१

"होतों घेत मुके" तदाहि वदलों "एकावरी एकसे;
"होता काळ जयीं विलसतां ना ठेविलें माप तें;
"आतां तें करण्या नसेचि अवधी, मृत्यू उभा ठाकला!
"देई शेवटचा मुका! पडलिशी भार्ये! अहा व्याकुला!

१३२

"कोठें भेटशिगे पुनः! कवळूं मी कोणा उराशीं अतां!
"आलिंगूं-कुरवाळुनी मृदुमुखा, कोणा प्रिये हांसतां?
"दुःखा! सोडुं नको मला निशिदिनी राहे जडोनी हृदा;
"पायीं नित्य तुझ्या, प्रिया स्मरणरे होवो मला तें सदा!"

१३३

माते भोंवति लेंकुरें बसतसां जीं हांसतीं खेळतीं,
माते कंठिं सुशोभित दिसां रत्नांचिया माळतीं,
कांगे काळ तुह्मांप्रती प्रियसखे घेवोनिया पातला
कीं तैं दिव्य महा समूळ खुडला मेरूमणी त्यांतला!

१३४

सन्यासा अजि घेउनी कठिण हा संसार मी सोडितों
जावोनी मठि बैसतों निवळसें वैराग्य तैं जोडितों
योग्यांचा करुनी समागम अतां मिथ्या प्रपंचा तुला
लत्ता दीर्घचि मारितों क्षणि असा हा देह वेताकला!

१३५

चित्तीं शब्द परी सखे! उमटले "मायेस सोडूं नका"
मायेच्या मठि बैसुनी तिथ तिच्या सेवीन मी पादुका
योगा साधिन मी सुकोमल जिथें माता स्वकीया वसे
रक्षा लावुं कशा? न का तनुचिया रक्षाचिं झाली असे!

१३६

'माता टाकुं नका' प्रिये वदलिशी 'माझे स्थळीं व्हा अतां'
केला मी जरिं प्रेम, होइ तरि का माझी तुझी साम्यता?
कोठें तूं गुणखाणि सौख्यद, कुठें मी अल्प गे पामर?
कोठें तें खगपुच्छ, रंग भरलें कोठेंचि वा चामर?

१३७

नेत्रांनों दमलां अहो उगि असा कां अश्रु हे गाळतां
कां होतां अजि मंद नित्यरुदनें, ऐसेचि कां वाळतां
काळें दुःख तुह्मांपरी करियलें तें कोणहो पाहिलं!
झाल्या शुष्क तुह्मी जलांजलि सदा ती कोणहो वाहिल?

१३८

"अनंतें ठेवीलें" परम बुध हें बोलत तुका
"रहावें तैसें मी;" वचनचि खरें; कां रडुं फुका
विधात्यानें केलें सकल शिरसा वंद्य मजला,
विलापें कांतेच्या जरि मम असे प्राण बुजला.

१३९

देवें जें घडिलें तसेंचि घडलें ना मी आतां तो रडें?
केले यत्न अह्मी कितीहि तरि जें होणार तेंची घडे.
ठेवावा सगळाचि भार सदधा आह्मी तुझ्यिेवरी
जें जें तूं करिशी सदैव असुंदे तें मान्य सर्वेपरी

१४०

कांग सुंदरी! धांव घेतली?
घोर या हृदीं आग चेतली;
तूं जरी सखे शांति पावशी;
कष्टतों! कधीं सांग भेटशी?

१४१

बोलबोलतां वर्ष जाहलें!
गोड शब्द गे नाहिं ऐकिले!
देह राहतो भूमियेवरी
प्राण फीरतो योजनें दुरी.

१४२

भगिनिवृंद हें माशि जोडिलें
ह्मणुनि हे तरी दीन काढले;
कळवळोन तैं धीर दीधला
ह्मणुनि ना पुरा जाळ बाधला.

१४३

ऐक्यभाव त्वां माशिं ठेविला
एक देव तो नित्य सेविला
धर्म आचरें तो स्विकारिला
भक्तिमार्ग सप्रेम साधिला.

१४४

पत्निधर्म गे पाळिला सदा
सत्यवाक्य ना सोडिलें कदा
प्रीय काय शृंगारलीस गे
सद्गुणाचिये दिव्यशा नगें

१४५

वळखिलें तुवां नाहिं निंदका
पुजियल्या मनीं संतपादुका
परधनास त्वां नाहिं वांछिलें
परजनां कधीं नाहिं गांजिलें

१४६

स्वार्थबुद्धिला बद्ध राखिलें
द्वेषभाषणा नित्य त्यागिलें
जाणलें मनीं पातकी जना
दुःख ना दिलें त्यांचिये मना

१४७

हळहळें प्रभो! घेउं दे दया
सुख जगांतलें पावलें लया;
आणि वाटतें पत्निच्याविणें
जळणुकी पुढें काय तें जिणें!

१४८

सेवका कसा घोर पाडला
खेळखेळतां बाळ नाडला
धांवरे प्रभो धांव संकटीं!
त्राणरे करीं, ऐक हाकटी!

१४९

शक्ति देशि तूं, साहि दुःख तें
दीन गांजलों हे जगत्पते !
शीघ्र यातनां पासूनि मला
सोडवीं अतां, गेलि कोमला

१५०

नाहिं मौज त्या जीवितामधीं
एकदा न मी राहिलों कधीं
राहुनि अतां काय तें करूं ?
शीघ्र भेटवीं पत्नि गोजरू

## पदसंग्रह.*

१ जिल्हा झिंजोटी.—ताल एका.

हर! हर! हर! प्रभू! दिव्य प्राण नेला!
शोकग्रस्त तिमिरमय दिन कसा उदेला! ॥ ध्रु० ॥
तरणि पतिव्रता सगुण।
दुहिता तशि परम करुण।
भगिनि अति प्रेम पूर्ण।
जनि सुधा-सुभेला ॥ १ ॥ हर! हर!

भोगित असूं निजविलास।
वधुवर करूं प्रेमवास।

* हा पदसंग्रह रा. रा. रावजी बुवा प्रार्थनासमाजाकडील गवई यांच्या साहायानें रागरागिणीवर बसविला.

तंव प्रियेस्ति न्यावयास ।
मृत्यु उभा ठेला ॥ २ ॥ हर! हर!

अक्षय सुख भोगि जरी ।
प्रभु तवपदिं वास करी ।
दीन परिं अनाथ-घरीं ।
रत्न-ऱ्हास केला ॥ ३ ॥ हर! हर!

२ जिल्हा पिलू.—ताल दीपचंदी.

क्यौं हो प्रभूजी मुझको डुबाया
क्या मैंने ऐसा तुमको सताया ॥ ध्रु० ॥
सुंदर तुह्नि मेरा प्रान हराया ।
अंधेर चौंफेर सारा बनाया ॥ १ ॥ क्यौं हो०
सुख दीया मुझको वो नहीं पाया ।
क्यौं सुखकी राह खाली बताया ॥ २ ॥ क्यौं हो०
खाना पिना सब हाथोंसे दीया ।
वहि हाथसे पीछु तुमने उठाया ॥ ३ ॥ क्यौं हो०

३ राग कल्याणीचा मांझ—ताल त्रिवट.

सखये! काय घडली, ऐशी काय घडली
गोष्टही काय घडली! ॥ ध्रु० ॥
प्रभुला स्वर्गीं सत्प्राण्यांची
काय वाण पडली ॥ १ ॥ ऐशी काय०

रात्रंदिन, जी सन्निध नांदे
कोठें तनु दडली ॥ २ ॥ ऐशी काय०

वाढविली जरि प्रेमल यत्नें
कैशी वाढ खुटली ॥ ३ ॥ ऐशी काय०

प्रेमें पाळिली पिंजऱ्यामधुनि
जशिका चिडि उडली ॥ ४ ॥ ऐशी काय०
दुष्कृति का मी केलि अजाणें
कीं ती तुज नडली ॥ ५ ॥ ऐशी काय०
जातां चुटका लावियलाशी
सारी महि रडली ॥ ६ ॥ ऐशी काय०
काय सुखाची आशा केली
अंतीं कशि बुडली ॥ ७ ॥ ऐशी काय०
फलण्याचा जधिं काळ समीप
येतां कळि झडली ॥ ८ ॥ ऐशी काय०
आहा! कैशी प्रिया माझी
हिरकणि गे खेडली ॥ ९ ॥ ऐशी काय०
पति सेवनिं गे कोमल-हृदयी
रात्रंदिन गढली ॥ १० ॥ ऐशी काय०

४ जिल्हा काफी,—ताल दीपचंदी.

उल्लंघूं विरह-नगा
सखये! कवणेपरी मी समजूत करुनी
उल्लंघूं विरह-नगा ॥ ध्रु० ॥
आठवुनी तुज निशिदिनीं रडतों
राहूं कसा मी उगा ॥ १ ॥ सखये०
गेलीस टाकुनी कां गे मला तूं
कंटाळलिस का जगा ॥ २ ॥ सखये०
विनय मखी संतुष्ट तूं संतत
झाली न गृहिं का निगा ॥ ३ ॥ सखये०

अढळपदीं तुज नेऊनि, मजला
काळें दिला हा दगा ॥ ४ ॥ सखये०

५ राग जोगी,—ताल एका.

बुडलें घर गे प्राणप्रिये!
कैसा घाला आला हा ॥ ध्रु० ॥

घडलें ऐसें कोणचि पाप
का दिधलासे कोणी शाप
कीं तैं करि मी नित्य विलाप
विरहताप मज जाळी ॥ १ ॥ बुडलें०

असतें दगडी मन माझें
वाहतों डोईं तरि ओझें
आतां कैंची आग विझे
स्मरणिं तुझे भडके ती ॥ २ ॥ बुडलें०

होतिस माझ्या जिविचा जीव
सन्निध असतां नव्हति उणीव
झालों आतां मी निर्जीव
येवो कींव देवाला ॥ ३ ॥ बुडलें०

६ राग केसुरी,—ताल त्रिवट.

किति काल पडे दिन जाति कसे?
भवसागर घोरद फार दिसे ॥ ध्रु० ॥

घडि माजि कसा बुडलों बुडलों
अजि दुःखसरीं हर! सांपडलों ॥ १ ॥ किति०

कुणि आणुनि द्या मम प्राणसखी
पति सेवनिं सादर हास्यमुखी ॥ २ ॥ किति०

भटकें जरि मी नगरोनगरीं
न मिळे कधिं सुंदर ती नवरी ॥ ३ ॥ किति०
बहु देइन मी धन रत्न सुखा
मज दाविल जो मम पत्निमुखा ॥४॥ किति०
विनयें सुअलंकृत जी वनिता
प्रभु! भेटवि, वांछित दे विनता ॥५॥ किति०

७ राग कल्याणीचा मांझ,—ताल त्रिवट.

लक्ष्मीचा अवतार, सगुण सकुमार
सौख्याचें भांडार, गेलें गेलें हस्तपार ॥ ध्रु० ॥
मिळलें होतें अवचित मज जें
दुर्मिळ वारंवार ॥ १ ॥ लक्ष्मी०
रसातळाशीं गेला आतां
सारा तो संसार ॥ २ ॥ लक्ष्मीचा०
देवा कैसा दुःखाचा हा
डोईं वाहूं भार ॥ ३ ॥ लक्ष्मीचा०
नाना जरिही भोग मिळाले
त्यांतिल गेलें सार ॥ ४ ॥ लक्ष्मीचा०
अशा प्रसंगीं तव करुणा प्रभु
एकचि रे आधार ॥ ५ ॥ लक्ष्मीचा०
जरि करिशी तूं शांत मना या
होइल तें निर्धार ॥ ६ ॥ लक्ष्मीचा०

८ राग बेहाग,—ताल त्रिवट.

प्राणेश्वरी! तूं गेलीस आतां
हें दुःख साहूं कसा ॥ ध्रु० ॥

आम्लत्व आलें कैसें अकालीं
संसार-सुख-गोरसा ॥ १ ॥ प्राणेश्वरी०
शीणत्व आलें साऱ्या शरीरा
झालों जित्या मृतसा ॥ २ ॥ प्राणेश्वरी०
पाजील आतां कोण गे त्याला
औषध-दिव्य-रसा ॥ ३ ॥ प्राणेश्वरी०
औषधी गेलीस संजीवनी तूं
सुख नूरलें मानसा ॥ ४ ॥ प्राणेश्वरी०
सत्कार्यीं तूं झिजलीस जैशी
झिजो हाचि देहो तसा ॥ ५ ॥ प्राणेश्वरी०

९ भैरवी,—ताल त्रिवट.

प्रभुराया! काय उद्भवला मम भोग
घडला कीं ऐसा भार्येचा वियोग ॥ ध्रु० ॥
मज ऐसें कां रे दंडीलें बा दीना
नुरलेंची मातें सौख्य दैवहीना
पाण्याविना का प्राण राहे मीना ?
जीवेल कैसा प्राण हा तिजवीना ॥ १ ॥ प्रभु०.
घाडीलें देवा! दुःख का शासना?
कटु विष तरि कां दिधलें ना प्राशना?
विषप्रयोगाच्या पुरवती वेदना
विरह परी हा क्षण एक सोसेना ॥ २ ॥ प्रभु०
परदारे ठायीं मन नाहीं ठेवीलें
एकपत्निव्रत नित्य म्यां अचरीलें
प्रेमळ कान्ते निष्ठेनें सेवीलें
संसार सुख का ह्मणुनीया अंतरलें ॥ ३ ॥ प्रभु०

१० राग परज,—ताल एका.

प्रिये काय करूं तूजविणें चैन पडेना ॥ ध्रु० ॥
उचंबळति दुःख लहरी, ह्रदयांतरिं वरचेवरि ।
हस्तें मम नित्यकर्म, पूर्णपणें सकळ घडेना ॥ १ ॥ प्रिये०
बसत असूं दिनहि रात, गृह-सुख-सागरिं नहात ।
घेउनि करि मृत्यु घात, नरदेह त्या हातुनी सुटेना ॥२॥ प्रिये०
शोधिलीं तळीं विहिरी, भटकलों घरोघरिं जरि ।
भेट न होई जाणतसें, परि संशय मनिचा फिटेना॥३॥प्रिये.

११ राग जोगी,—ताल एका.

काळा! मम भार्या गुणराशी । क्रूर कैसारे नेशी॥ अवघें
तव करणी सुख नाशी । राखिलि न कां मजपाशीं ॥ध्रु०॥
घटकेमाजी पडला अवचित हा । दुकाळ कसा तो पहा॥
पेटे प्रज्वल अंतर्दाहा । भारें दुःखाच्या महा ॥ १ ॥ काळा!
दुःसह घायें हा ह्रद हाणियला । का अपराध जहाला॥
कशासाठीं हा घाला । मजवरि आणियेला ॥२॥ काळा!

१२ जिल्हा झिंजोटी,—ताल एका.

लागलि ह्रदिं हाय हाय। दुःख केविं साहूं ॥ ध्रु० ॥
दिव्य समुखचंद्रमा, अतां कुठें पाहूं ।
कसा सखे शिरीं वियोग-भार दीन वाहूं ॥ १ ॥लागलि०
घोर आगटींत मी, कसा उभा गे! राहूं ।
दुःखडोहीं सांग अतां, नित्य काय नाहूं ॥ २ ॥ लागलि०
वाटतें पहावें मुखा, परि कुणास बाहूं ।
प्रभुपदीं सुखी असेस, कां मनास दाहूं ॥ ३ ॥ लागलि०

१३ जिल्हा पिलु—ताल दीपचंदी.

संगत मोरी छोराई। क्यौं तुम संगत मोरी छोराई ॥ ध्रु० ॥
सोवुं या जागूं, काभी करूं तो।
नयनमों मुद्रा भराई ॥ १ ॥ क्यौं तुम०
स्वर्गकी मंझल, मुझसाथ करनेलिये।
क्यौं नहिं काया ठहराई ॥ २ ॥ क्यौं तुम०
प्रभु चरणोंका अमृत-भेला।
क्यौं तूं अकेली चराई ॥ ३ ॥ क्यौं तुम०
संसार दुःखसे तुझे छोरलीया।
प्रभुरायकी हे दुहाई ॥ ४ ॥ क्यौं तुम०
प्रीत लगाना, प्यारी उठाना
क्या मृत्यु! इह है भलाई ॥ ५ ॥ क्यौं तुम०
बुड्ढे अपंग क्या, थोरे परेथे।
मागत मोत सवाई ॥ ६ ॥ क्यौं तुम०

१४ राग पिलु,—ताल त्रिवट.

भोगावें सौख्य जगींचें, प्रभु परि तें शाश्वत नाहीं ॥ध्रु०॥
लोटीलें ह्मणुनी कारे, दुःखाच्या डोहीं देवा!
सरला कीं आजि मम सारा पुण्याचा संचित ठेवा?
नेला कीं भक्षित असतां हातींचा मधुर मेवा!
(चाल) काळ अतां जातां वाटे
दुःसह बहु; हृद मम फाटे!
कंठ बहु स्मरणें दाटे
नुरलीसे आशा कांहीं ॥ १ ॥ भोगावें०

कोठें तरि शोधुनि कोणी दिव्या मम जाया आणा
भार्याधन जाउनि झालों, जरि निर्धन दैन्यवाणा
तरि देइन कुणि जें मागे, हरपल्या दावा प्राणा!

(चाल) लावियली ममता भारी
सखिनें; अजि पडलों हारीं;
कोण दुजा यांतुनि तारी,
बुडलों प्रभु त्राहि त्राहि! ॥२॥ भोगावें०

का कोठें मार्ग दुरीचा भासकली एकटि जातां?
का आले पर्वत आड रस्त्यामधिं परतुनि येतां?
कीं उलंघुनि सप्त समुद्र भार्या ती घेइल आतां?

(चाल) कीं धरतां घरच्या वाटे
खोळंबविली कुणि कोठें?
हृदिं खुपले विरह कांटे,
दावि प्रिया प्रभु लवलाही ॥ ३ ॥ भोगावें०

१५ राग कानडा,—ताल त्रिवट.

जीवन धारण जीवन कारण,
जीवन तारण ज्या पायीं।
त्या प्रभुइच्छेपुढें नमावें
ठेवुनि भार तये ठायीं ॥ ध्रु० ॥

अफाट सागर आयुष्याचा,
प्रभुकृपेविण तरूं केवीं।
सुंदर जाया नाव जशी का,
बुडली अवचित भवडोहीं ॥ १ ॥ जीवन०

संकट येवो, हानी होवो,
जिविचा जावो गोड गडी ।
परि न ढळो मन दुःखित होतां,
जी घडि जाई ती सुघडी ॥ २ ॥ जीवन०
दुःख तीव्रता हरे तयांची,
ज्यां प्रभुराय धरी पदरीं ।
माते उदरिं जें दया निर्मिली,
स्वयें दावितो निर्धारीं ॥ ३ ॥ जीवन०

१६ राग धनाश्री,—ताल एका.

भगिनी! ये आसवें गाळूं ।
एकवट, ये आसवें गाळूं ॥ ध्रु० ॥
गेलि प्रियाती मैत्रिण अपुली ।
मधुरा कनवाळू ॥ १ ॥ दुःखित ये आसवें०
शांत झालि ती संसाराचे ।
सोडुनि जंजाळू ॥ २ ॥ कोमले! ये आसवें०
आजवरी ज्या प्रेमें जडलों ।
प्रेमा त्या पाळूं ॥ ३ ॥ बसुनी ये आसवें०
अश्रुसागरीं प्रतिमा सुंदर ।
दिसते ती न्याहळूं ॥४॥ न्याहळित ये आसवें०
निसूर तेथें वास करो ती ।
राहि जिथ भूपाळू ॥५॥ प्रार्थित ये आसवें०

१७ राग बरुवा,—ताल त्रिवट.

चंद्रिके! अवकाळिं लोप, कसा झाला गे! ॥ध्रु०॥
युक्तिनें वाढविला, दाहें परी ज्वराच्या
करपला कोंवळासा रोंप ॥१॥ सुंदरे! अवकाळिं लोप०

प्रार्थिलें देवा तरी नाहीं तयें ऐकिलें
का केला मजवरी कोप ॥२॥ मोहने! अवकाळि लोप०
संकटीं धांवोनिया केलें नाहीं त्राण गे ।
कुठें तया लागली का झोंप ॥ ३ ॥ कोमले! अवकाळि०
क्षेम कुशळ ना वर्ष एक कळलें ।
पाठवीं कुशळ निरोप ॥ ४ ॥ वत्सले! अवकाळि०
दैवहीन मी तरी तुज रत्नास मुकलों ।
का ठेवूं कुणावरी आरोप ॥ ५ ॥ रंजने! अवकाळि०
तुजवीण राजसे! शून्य हा संसार ।
तयाची गे व्यर्थ खटाटोप ॥ ६ ॥ प्रेमले! अवकाळि०

१८ राग काफि,—ताल दीपचंदी

भगिनी! पुसि अश्रु माझे । व्याकूळ झालों मनीं ॥ध्रु०॥
कोमल हस्त मुखावर फिरवी ।
मशि बोल मधुवचनी ॥ १ ॥ भगिनी!
फिरवूनी पदर नयनावरती ।
येउं नेदि आसू नयनीं ॥ २ ॥ भगिनी!
बहिण भावंडें नांदूं प्रेमानें ।
एकवट जगिं राहुनी ॥ ३ ॥ भगिनी!
जाणशी ह्रद्गत अधिक मी काय ।
दावुं गे तुज बोलुनी ॥ ४ ॥ भगिनी!
देतों जगा टाकुन परी तुमच्या ।
राहे प्रीतित गुंतुनी ॥ ५ ॥ भगिनी!

१९ राग बरवा,—ताल त्रिताट.

कशि अहा! पडली ही धाड । प्राणप्रिये गे ॥ ध्रु० ॥
निरपराध्यां गांजियलें का ।

कि आलों कुणा सौख्या आड ॥१॥ कशि अहा!
वाढत असतां सुंदर वृक्ष।
अवचित पडली कुऱ्हाड ॥ २ ॥ कशि अहा!
गांजिलें ह्मणोन उठविलें तुवां का।
घेवुनी आपुलें बिऱ्हाड ॥ ३ ॥ कशि अहा!
थोरहि वीर न टिके काळापुढें।
अपुला तेथ काय पाड ॥ ४ ॥ कशि अहा!
दशदीशा या सखि तूजवीण।
वाटती मजला उजाड ॥ ५ ॥ कशि अहा!

२० राग परज, —ताल त्रिवट.

चिन्मय विघ्नविनाशा। मागें भार्यादान परेशा ॥ धु० ॥
विनत देवा आलों, द्वारिं तव ठेलों
दे दयिता अविनाशा ॥ १ ॥ चिन्मय०
दावि, हृदांतरीं सतत वसे जी
पूर्ण करीं अभिलाषा ॥ २ ॥ चिन्मय०
सौख्य भवार्णवीं सतिविण नाहीं
कैशी झालि निराशा ॥ ३ ॥ चिन्मय०
विनवि घडोघडीं परि दाविशी ना
पावशि कधि संतोषा ॥ ४ ॥ चिन्मय०
नेतां मंगलधामीं मज दीना ती
भेटे, करि ही आशा ॥ ५ ॥ चिन्मय०
करितों बद्ध तिला परि त्वां केलें
निर्जिव मायापाशां ॥ ६ ॥ चिन्मय०
शरणागताकरीं कां रे पावल्या
औषधवल्ली अपेशा ॥ ७ ॥ चिन्मय०

हे अजरामरा! भेटवि कांता
अंतीं स्वयंप्रकाशा ॥ ८ ॥ चिन्मय०

अंजनिगीत.

गेलिस मजवरि रुसुनीयां का
कंठ शोषला मारुनि हांका
कैसा साहूं हा मी धोका—
माझ्या गे भार्ये! ॥ १ ॥

तळमळ चित्ता लागलि भारी
का फिरल्याला दारोदारीं
कोणी या तुज घालिल पदरीं
भिक्षा गे भार्ये! ॥ २ ॥

मिळशी घेतां, घेइन झोळी
मागत भिक्षा आळोआळीं
फिरेन परि न ही सोसत होळी
हृदयाची भार्ये! ॥ ३ ॥

कां मातेला पडला घोर
भावंडांचें गेलें जोर
भर्त्त्याचा तो उतरे नूर
जातां तूं भार्ये! ॥ ४ ॥

किती निवळ तूं होतिस गोड
नित्य नवें पुरवावें कोड
झाला ऐन उमेदित मोड
माझा गे भार्ये! ॥ ५ ॥

शब्द कठिण का [illegible]डावाटे

पडला ह्मणुनी स्वर्गकपाटें
अक्षय सौख्याचें त्वां साटें
केलें गे भार्ये! ॥ ६ ॥

कां न राहिलिस थोडे दिवस
संसाराची पुरविलि हौस
झाला प्रीती-रस-विध्वंस
कैसा गे भार्ये! ॥ ७ ॥

कां न ठेविलें एकहि बालक—
प्रेम जनित वा प्रीती-स्मारक!
जाणे स्वकला तो जगचालक
एकचि गे भार्ये! ॥ ८ ॥

काळ गणेना रंक कि राजे
दुःख दावितो वदवेना जें.
ह्रदयिं उठुन तें ह्रदयिच माजे
दुःसह गे भार्ये! ॥ ९ ॥

काय प्रभूला पडली वाण
क्लेशांपासूनि केलें न त्राण
ह्रदय हाणिती विरहबाण
रात्रंदिन भार्ये! ॥ १० ॥

दिंड्या.

काय बैसोनी खळखळा रडावें
आंग टाकोनी क्षितिवरी पडावें?

घेइ परतुनि का ऐसि ये रितीनें
वाट धरलीसे अमृता सतीनें ॥ १ ॥

काय भानूला निववि शीत इंदु?
काय ज्वालांतें विझवि बाष्पबिंदु?
काय मुंगी शोषील जलधिलागीं?
काय औषधिनें हा निवे अभागी ॥ २ ॥

दंश दुःखाचा हृदीं जडुन गेला
नित्य-शोकाचा काळ हा उदेला
मृत्यु नाहीं कां मजशि युद्धि ठेला?
कपट रुपें सुकुमार प्राण नेला ॥ ३ ॥

घोर रात्री युगसमा दिनहि जाती
नाहिं निद्रा राहिली नेत्रपातीं ॥
काय अपराधें घात असा झाला
घोर दुःखाचा दिवस आजि आला ॥ ४ ॥

सांग शोधूं का सखे सत्परस्वर्ग
कीं ग संगें घेउनी आत्पवर्ग
स्वर्गमार्गीं येशील भेटण्याला
अंति आनंदें उभय नांदण्याला ॥ ५ ॥

प्रिये! कान्ते! सुंदरे! कोमलांगे
हास्यवदने! कधि भेटशी मला गे!
उघडण्या कीं मज स्वर्गिचें कपाट
आधि धरलिस तूं स्वयें स्वर्गवाट ॥ ६ ॥

धन्य भार्ये! मरणीं हि पाळशी तूं
धर्म सेवेचा—नित्य तुझा हेतू
जरि देवा! वर तिज न तिचा नेला
देइं उत्तम गति अश्या सुभार्येला ॥ ७ ॥

---

## पत्निमाताश्रुमार्जन.

श्लोक.

रुदन करुं नका हो माय मायावतारी!
नयन मज पुसोंद्या प्रीय ते अश्रुधारी
निशिदिनि शिणलां हो त्या करोनी विलापा
रडुन शकुं पुनः का पाहुं त्या सुस्वरूपा ॥ १ ॥

घडिमधिं जरि केलें आपुल्या शून्य ग्रामा
अनिश सुपदिं नांदो पावुनी ती विरामा
किति तरि रडलों हो, ये न तें कांहि कामा
परम विमल गेला प्राण आनंदधामा ॥ २ ॥

मज तुह्मि सुत-कन्या एक देहांत माना
अजिवरि पाळियल्या प्रेम योजूनि नाना—
पदिं रत तुमच्या या बालका हातुनीहो
परम करुण माये! चाकरी नित्य लाहो ॥ ३ ॥

समाप्त.

धन्य भार्ये! मरणीं हि पाळशी तूं
धर्म सेवेचा—नित्य तुझा हेतू
जरि देवा! वर तिज न तिचा नेला
देइं उत्तम गति अश्या सुभार्येला ॥ ७ ॥

---

## पत्निमाताश्रुमार्जन.

श्लोक.

रुदन करुं नका हो माय मायावलारी!
नयन मज पुसोंद्या प्रीय ते अश्रुधारी
निशिदिनि शिणलां हो त्या करोनी विलापा
रडुन शकुं पुनः का पाहुं त्या सुस्वरूपा ॥ १ ॥

घडिमधिं जरि केलें आपुल्या शून्य ग्रामा
अनिश सुपदिं नांदो पावुनी ती विरामा
किति तरि रडलों हो, ये न तें कांहि कामा
परम विमल गेला प्राण आनंदधामा ॥ २ ॥

मज तुह्मि सुत-कन्या एक देहांत माना
अजिवरि पाळियल्या प्रेम योजूनि नाना—
पदिं रत तुमच्या या बालका हातुनीहो
परम करुण माये! चाकरी नित्य लाहो ॥ ३ ॥

समाप्त.